**L. C. BILL No. V OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT, 1999

## सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५.

### महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

२००१ चा महा. ११.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) अधिनियम, २०२३ असे म्हणावे.

(शा.म.मु) एचबी–२८१४-१ (१५५—३–२०२३)

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, ताबडतोब अंमलात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम १० ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ याच्या कलम १० मधील पोट-कलम (६) च्या खंड (अ) व (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :–

" (अ) राज्य शासकीय विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन सहाय्यित संस्था आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर वर्ग तीन आणि वर्ग चार संवर्गातील पदावर सर्व सेवांमध्ये प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याचे निष्कर्ष लक्षात घेता ज्या प्रकल्पासाठी जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत त्या प्रकल्पातील वर्ग तीन व वर्ग चार संवर्गाच्या एकूण मंजूर पदांच्या २५ टक्के जागा आरक्षित करण्यात येईल व त्या थेट मार्गाने भरण्यात येतील.

(ब) राज्य शासनाचे अनुरूप भाग, अंशदान इत्यादींच्या रूपात सहाय्य मिळणाऱ्या लाभधारक व्यक्ती, संस्था, कंपन्या, कारखाने, साखर कारखाने, सूत गिरण्या; आपल्या वर्ग तीन आणि वर्ग चार संवर्गाच्या पदांकरिता किंवा तत्सम अतांत्रिक कर्मचारी वर्गाकरिता बाधित व्यक्तींच्या नामनिर्देशनासाठी एकूण मंजूर पदांच्या किमान २५ टक्के जागा आरक्षित करण्यात येईल व त्या थेट मार्गाने भरण्यात येतील."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने शासनामार्फत विविध प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित केल्या आहेत. कोणताही प्रकल्प पूर्ण होण्यासाठी प्रकल्पग्रस्तांचे योगदान व त्याग महत्त्वाचा आहे. शेतजमीन शासनाच्या प्रकल्पांसाठी संपादित केल्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकरी देऊन रोजगार उपलब्ध करणे आवश्यक आहे. परंतु सद्यःस्थितीत राज्यातील विविध प्रकल्पांमुळे अंदाजे ५ लक्ष प्रकल्पग्रस्त बाधित झालेले आहेत. तसेच राज्यात आगामी काळात नवीन प्रकल्प येणार असल्यामुळे पर्यायाने प्रकल्पग्रस्तांची संख्याही वाढणार आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या नामनिर्देशित उमेदवारांसाठी सध्या असलेला ५ टक्के कोटा तसाच ठेवल्यास सर्व प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध होऊ शकणार नाही. त्यामुळे दिवसेंदिवस प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही प्रकल्पांसाठी जमिनी संपादित होऊन ५० वर्षांपेक्षा अधिकचा कालावधी झालेला असूनही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होऊ शकलेले नाही. प्रकल्पग्रस्तांचे १०० टक्के पुनर्वसन होण्यासाठी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम १० मधील पोट-कलम (६) च्या खंड (अ) व (ब) मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा मुख्य हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १७ जानेवारी, २०२३.

**अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.

**श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे सन २०२३ चे वि. प. विधेयक क्रमांक ५.—महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ यातील उतारे.)**
**(सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.)**

**१.** ते **९.** * * * *

**१०.** (१) ते (५) * * * * बाधित व्यक्तींचे पुनर्वसन.

(६) (अ) राज्य शासकीय विभाग सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम स्थानिक स्वराज्य संस्था, शासन सहायक संस्था आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर वर्ग तीन आणि वर्ग चार प्रवर्गातील सर्व सेवांमध्ये बाधित व्यक्तींच्या नामनिर्देशितांसाठी रोजगाराकरिता किमान ५ टक्के प्राथम्य कोटा असेल.

(ब) राज्य शासनाचे अनुरूप भाग अंशदान इत्यादींच्या रूपात सहाय्य मिळणाऱ्या लाभधारक व्यक्ती, संस्था, कंपन्या, कारखाने, साखर कारखाने, सूत गिरण्या आपल्या वर्ग तीन आणि वर्ग चार संवर्गाच्या पदांकरिता किंवा तत्सम अतांत्रिक कर्मचारी वर्गाकरिता बाधित व्यक्तीच्या नामनिर्देशितांसाठी किमान ५ टक्के रोजगाराची तरतूद करतील :

परंतु वरील प्राथम्यक्रम हा खुल्या आणि विभिन्न आरक्षण प्रवर्गामधील यथाप्रमाण पसंतीक्रम समजला जाईल ;

(क) * * * *

**११.** ते **२९.** * * * *

**अनुसूची** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५.]**

**[महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.